


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७५३ . वा    शनिवार    दि. २७ एप्रिल २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये




# जिल्ह्यात मतदानाचा टक्का गेल्यावर्षीच्या तुलनेत घसरला...

## जिल्ह्यात ५२.२४% मतदान प्राथमिक अंदाजानुसार

## येत्या ४ जून रोजी कोणाचे उघडणार भाग्य आणि कोणाला बसणार फटका?

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या काही दिवसात बुलढाणा जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट व अवकाळी पाऊस सुरू आहे अगदी मतदानाच्या दिवशी सुद्धा या अवकाळी पावसाने वसंत घेतली नाही अशा या अवकाळ्यातही मात्र मताच्या टक्केवारी ला लागली ती गळती शुक्रवार २६ एप्रिल च्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत मिळालेल्या प्राथमिक अंदाजानुसार केवळ ५२.२४% मतदान झाल्याची नोंद आहे २०१९ मध्ये हेच मतदान ६३% च्या पुढे गेले होते विशेष म्हणजे दुपारपर्यंत मतदानाचा फ्लो हा खूपच स्लो होता. काही मतदान केंद्रावर सायंकाळी उशिरापर्यंत मतदान सुरू होते त्यामुळे फायनल आकडेवारी ही पुढे येऊ शकते. लोकसभा निवडणुकीच्या या उठवलेल्या वादळात राजकीय वाऱ्यांची दिशा मात्र संभ्रमित करणारी आहे. बुलढाणा लोकसभेसाठी सरासरी ५२. २४% मतदान झाले असून सर्वाधिक मतदान मेकर येथे ५८.७२% तर सर्वात कमी बुलढाणा येथे ४२.६७% झाल्याचे वृत्त आहे. येत्या ४ जून रोजी रणसंग्रामाचा फैसला होणार असून ईव्हीएम मशीन मध्ये बंद झालेले २१ उमेदवारांचे भाग्य त्यातून बाहेर येणार आहे बुलढाणा मतदार संघात सर्वात शांततेत मतदान झाले कुठेही अनुचित प्रकार घडलेला नाही हा लोकसभा मतदारसंघ खूप मोठा असल्याने अधिकृत मतदानाचे आकडेवारी रात्री ही उशिरापर्यंत जिल्हा प्रशासनाला प्राप्त होऊ शकली नव्हती. मतदानाला सकाळी सात वाजता प्रारंभ झाला तर हे मतदान सायंकाळी सहा वाजेपर्यंत चालले अनेक ठिकाणी





शेवटच्या टप्प्यात मतदान केंद्रावर गर्दी झाल्यामुळे ते सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होते सर्वच उमेदवारांनी तथा राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या मतदानात कुटुंबियासह उत्सुकपणे सहभाग घेतला तरुणासह वृद्धांचाही सहभाग मतदानासाठी वाटत होता शहरी तथा ग्रामीण भागातही मतदान शांततेत पण उत्साहात झाले बुलढाणा लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ येतात त्यात मतदारांची संख्या १७ लाख ८२ हजार ७०० एवढी असून पुरुष मतदार नऊ लाख ३३ हजार १७३ तर स्त्री मतदार आठ लाख ४९ हजार ५०३ एवढी आहे जिल्ह्यात १९७१ मतदान केंद्रावर उत्साहात मतदान झाले जिल्हा मुख्यालय असणाऱ्या बुलढाणा विधानसभा मतदारसंघात सर्वत्र शांततेत मतदान पार पडले. अपवाद सोडला तर सर्वत्र मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली या निवडणुकीमध्ये एकूण २१ उमेदवारांनी सहभाग घेतला होता त्यात मुख्य लढत शिवसेनेचे प्रतापराव जाधव महाविकास आघाडीचे प्रा नरेंद्र खेडेकर अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर व अपक्ष उमेदवार संदीप शेळके तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंतराव मगर यांच्यात होती. अपक्षांच्या उमेदवारांमुळे लढतीची रंगत वाढली या निवडणुकीतही नोटा आहे नकाधिकाऱ्याचे बटन आले होते त्याचा वापर किती जणांनी केला हे पाहणे रंगतदार ठरणार आहे. येत्या चार जून रोजी मतदान पेटीत बंद असलेले भाग्य उजळणार. जिल्ह्याचा खासदार कोण होणार हे येत्या ४ जून रोजी कळणार त्यामुळे या निवडणुकीचा कोणाला होणार फायदा आणि कोणाचे होणार नुकसान हे सुद्धा कळणार

## जळगाव जा. विधानसभा मतदारसंघात ५३.९५% मतदान

**जनसंचलन/जळगाव जा.**

जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात ५३.९५% मतदान झाले होते संग्रामपूर तालुक्यातील ग्राम मारोड येथे रात्री ८:३० वाजेपर्यंत मतदान सुरू होते मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असली तरी ईव्हीएम मशीनची गती कमी असल्याची ओरड अनेक गावातून दिवसभर होत होती निर्धारित वेळेनुसार आज सकाळीच मतदान प्रक्रिया सुरुवात झाली दुपारपर्यंत मतदान प्रक्रिया जोरात पार पडली पण यानंतर मतदान प्रक्रियेने पुन्हा जोर पकडला नाही सायंकाळी सहा वाजेपर्यंत जळगाव जामोद मतदारसंघात ५३.९५% मतदान झाले यानंतर आकडेवारी उपलब्ध होऊ शकली नाही ग्राम मार-ोड येथे दिवसभर मतदानाची आकडेवारी




कमी होती पण सायंकाळी मतदार केंद्रावर गर्दी झाली यानंतर सर्व मतदारांनी केंद्राच्या आत घेण्यात आले व रात्री पावणे नऊ पर्यंत या गावात मतदान प्रक्रिया सुरु होती तर आलेवाडी काकोडा जास्त गाव यांच्यासह अनेक गावात मशीनची गती कमी असल्याने मतदान प्रक्रियेला उशीर लागल्याची ओरड होती संग्रामपूर जळगाव जामोद तालुक्यात धनुष्यबाण व मशाल मध्ये तुल्यबळ लढत झाल्याची वस्तुस्थिती आहे संग्रामपूर तालुक्यात सर्वाधिक मतद-ानाची आकडेवारी सोनाळा येथील आहे

## मोबाईल बंदी असतांना मतदानाचे फोटो व्हायरल

**जनसंचलन/बुलढाणा**

मतदान केंद्रामध्ये फोटो काढणे किंवा व्हिडिओ चित्रीकरण करणे यावर बंदी असतानाही ईव्हीएम मशीनवर मतदान करतानाचे फोटो व्हायरल होत आहे विशेष म्हणजे काही अति उत्साही समर्थक करून आपल्या उमेदवाराला केलेले मतदानाचे पुरावे म्हणून वायरल झाले आहेत अर्थातच मतदान केंद्र अधिकारी हे काय करत आहे की जाणून-बोधन दुर्लक्ष करीत आहे हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे पक्षाचे उमेदवार असो व अपक्ष उमेदवार त्यांची निशाणी समोर ईव्हीएम वरचे बटन दाबताना चा फोटो घाटावरून



तसेच घाटा खालून दोन्ही ठिकाणावरून त्यांच्या बाबतीतले फोटो व्हायरल होणे हा कार्यकर्त्यांचा अतिउत्सा असल्याचे स्पष्ट आहे त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणाला काळा घालावा जेणेकरून असे फोटो इतर विरोधी मतदारांचे मन वळवू शकतात अशी मागणी विरोधक करीत आहे

# चेकिंग अधिकाऱ्यांकडून महिला वाहकाचा विनयभंग...

## अधिकाऱ्याविरोधात पोलिसात गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

राज्य परिवहन मंडळाच्या लाईन चेकिंग अधिकाऱ्याने एका महिला वाहकाला शरीरसुखाची मागणी केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून अधिकाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. महामंडळाच्या आगारात कार्यरत असलेल्या एका ३८ वर्षीय वाहक महिलेला मागील काही दिवसांपासून परिवहन मंडळाचा लाइन चेकिंग अधिकारी त्रास देत होता. मंगळवारी वाहक महिला बस घेऊन, खामगाव तालुक्यातील एका गावात गेली. अधिकाऱ्याने चेकिंगसाठी बस



थांबविली. गैरवर्तन करून वाहक महिलेचा विनयभंग केला. खोट्या प्रकरणात अडकविण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. या तक्रारीवरून पिंपळगाव राजा पोलिसांनी संबंधित अधिकाऱ्याविरोधात भादंवि कलम ३८४, ३५४ अ, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास पीसएसआय किशोर बर्वे करत आहेत.

# चक्रीवादळाचा कहर अनेकांचे संसार उघड्यावर...

## इसरुळ मधील प्रतापनगरची घटना

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील इसरुळ मधील प्रतापनगर भागात २३ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान अचानक आलेल्या वादळी पावसाने व विशेषतः चक्रीवादळाने अक्षरशः कहर केला असून त्यामध्ये संपूर्ण प्रतापनगर ला त्याचा तडाखा बसला. त्यामध्ये अनेकांच्या घरावरचे टिन पत्रे उडून गेले तर काहीचे टिन पत्रे लोखंडी अँगलसह शंभर ते दीडशे फुटापर्यंत उडून गेले त्यामुळे घरात साठवून ठेवलेले गहू, हरभरा, सोयाबिन धान्याची पोती पावसाने भिजली आहेत. यासह कांदा, मका, बाजरी, ज्वारी या पिकाचे प्रचंड असे नुकसान झाले. त्यामुळे तेथील नागरिकांचे व लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.यामध्ये जीवित हानी जरी टळली असली तरी, शौर्य प्रमोद सोलाट या १० वर्षीय लहान मुलाच्या पायावर दगड पडल्याने गंभीर दुखापत झाली आहे.

खडकपूर्णा प्रकल्पामुळे इसरुळ गावाचे पुनर्वसन झाले आहे. असंख्य लोकांची शेती ही नवीन गावठाण पासून ७ किलोमीटर अंतरावर असल्याने शेती करण्यासाठी तेथील लोकांनी समूहाने घरे बांधली असुन तेथे १८ कुटूंब राहतात असुन तेथील लोकसंख्या १३३ आहे. पूर्वी वाडी म्हणून परिचीत असलेले २००९ मध्ये त्याचे प्रतापनगर म्हणून नामकरण करण्यात आले होते.



अगोदरच प्रतापनगर वाशी अनेक समस्याला तोंड देत आहे. केवळ शेती व्यवसाय करण्यासाठी ते मूळ इसरुळ गावापासून ७ किमी अंतरावर मराठवाडा व विदर्भ च्या सीमेवर शासनाच्या विविध सुख सुविधा शिवाय तेथे राहत आहेत. त्यातच त्यांच्यावर निसर्गाने चक्रीवादळाच्या रूपाने अचानक घाला घालून त्यांचे संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले असून अनेकांचे संसार उघड्यावर आले आहे. टीन पत्रे एखाद्या पाल्या पाचोळ्याप्रमाणे उडून जागोजागी छिद्र पडल्याने पूर्णतः भंगार झाले आहे. एकमेव आसलेल्या रस्त्यावर झाड उन्मळून पडल्याने सकाळी १० वाजेपर्यंत प्रतापनगर चा रस्ता बंद होता. त्याच बरोबर परिसरात ठिकठीकाणी विद्युत पोलची तार, मोठ मोठी झाडे, घरावरचे टिन उडल्याने त्यावर असलेले दगड पडल्याने जनजीवन विस्कळित होवून गेले. या नगराची पाहणी करून इसरुळ चे सरपंच सतीश पाटील भुतेकर यांनी या घटनेची माहिती तहसिलदार संतोष काकडे यांना दिली असता घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ सुचना केल्याने तलाठी गोविंदराव चव्हाण व कृषिसहायक विजय जोगदंडे यांनी पाहणी केली. नुकसान ग्रस्त घराची पाहणी करताना पोलीस पाटील जयपाल वायाळ, पत्रकार तथा ग्रा.प.सदस्य भिकनराव भुतेकर यांच्यासह अनेक गावातील नागरीक उपस्थित होते.

शासनाने लवकरात लवकर झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी अशी मागणी तेथील नागरीक करीत आहे.

# भादोला शिवारात आढळला एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा तालुक्यातील भादोला ते वरवंड मार्गालगत शेताजवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे.त्याचा आकस्मिक मृत्यूची नोंद बुलढाणा ग्रामीण पोलिस स्टेशन येथे करण्यात आली आहे.भादोला येथील पोलिस पाटील सूर्यकांत गवई यांनी एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती दिल्यानंतर ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोहेकॉं सुनील हिवाळे हे आपल्या सहकाऱ्यासह घटनास्थळी पोहोचले.पंचनामा करून ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. मात्र अद्याप मृताची ओळख पटू शकली नाही वय ४० ते ४५ वर्ष केस काळे पांढरे,ओठावर मिशी,उजव्या पायाच्या घोट्यावर जळाल्याची जुनी खून, त्यावर गाळा धागा बांधलेला, अंगात पांढऱ्या रंगाचे सॅण्डो बनियान,निळ्या रंगाचे अंतर्वस्त्र असे मृताचे वर्णन आहे.या वर्णनाच्या व्यक्तीबद्दल माहिती असल्यास संबंधितांनी ग्रामीण पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस अंमलदार सुनील हिवाळे यांनी केले आहे.

# बाजार समिती येथून अज्ञात चोरट्याने कार केली लंपास...

जनसंचलन/संग्रामपूर

ग्राम वरवंट बकाल येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतून कार चोरी गेल्याची घटना उघडकीस आली आहे. व्यवसायीक वैभव शेषराव भटकर रा.खैरखेर ता.अकोट हे २४ एप्रिल रोजी वरवट बकाल येथे एका कार्यक्रमांमध्ये आले असता त्यांनी कार क्रमांक एम.एच.३० बी.एल.४१९० ही वरूड बघायला कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात उभी केली होती. कार्यक्रम आटोपून पुन्हा कारखाने




आले असता त्यांना त्यांचे कार दिसून आली नाही. यावेळी त्यांनी तामगाव पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल केले आहे.

# जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी घसरली...

## शेकडो मतदार मतदानापासून वंचित निवडणूक विभागावर ठपका?

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा लोकसभा निवडणुकीत निवडणूकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांनी व निवडणूक आयोगाने जनजागृती केली.त्यासाठी लोखो रुपये खर्च केले. मतदार मतदान केंद्रावर गेला. मतदान कार्ड व आधार कार्ड दाखविले. मतदान अधिकारी म्हणतो तुमचे नाव माझ्या यादीत नाही. यादीत नांव आहे, पण त्यावर डिलीट चा शिक्का आहे. त्यामुळे मतदान करता येत नाही. बाहेर जावे. असे सांगून चक्क परत पाठविले. यादीत नांव असुनही मतदान करता आले नाही.गत बावीस वर्षापासून झालेल्या प्रत्येक निवडणूकीत मतदान केले. पण आज मतदान करता आले नाही. निवडणूक विभागाच्या या बहुचर्चित गोंधळा बाबत शेकडो वंछीत मतदारांनी भर उन्हात पायपीट करून निवडणूक अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून मदत मागितली. पण सॉरी काही




करु शकत नाही म्हणून मतदारांची घोर निराशाच केली. परिणामी मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणावर घसरली. आयोगाची जाहिरातबाजी चर्चे चा विषय महत्वाचा ठरला आहे. मतदान जागृती साठी निवडणूक आयोगाने मोठ्या प्रमाणावर जाहिरात बाजी केली. रॅली काढल्या. त्यावर प्रचंड खर्च केला. तो निव्वळ व्यर्थ गेला. अशी संतप्त प्रतिक्रिया मतदानापासून वंचित राहिलेला मतदार राजांनी व्यक्त केल्या। डिलीट चा शिक्का असलेल्या मतदारांसाठी मतदानाची व्यवस्था निवडणूक आयोगाने करावी. अशी मागणी आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# पैसे पकडल्याची अफवा सायबर सेल झाले सक्रिय पोलिस अधीक्षकांचे चौकशीचे आदेश



**जनसंचलन/बुलढाणा**

मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू असतानाच बुलढाणा जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांची रक्कम पकडण्यात आल्याच्या अफवेने जोर धरला होता. त्यामुळे शेवटी जिल्हा पोलिस अधीक्षकांना समोर येऊन असा कुठलाही प्रकार घडला नसल्याचे सांगत या प्रकरणात सायबर सेलला चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश द्यावे लागले.मेहकर आणि संग्रामपूर येथे कोट्यवधी रुपयांची रक्कम २५ एप्रिल रोजी रात्री पकडण्यात आल्याचे सांगण्यात येऊन समाजमाध्यमावर वृत्तान्ताच्या स्वरूपात ही माहिती पसरवली जात होती. थोडीथोडकी नाही तर साडेचार कोटी रुपयांहून अधिक रक्कम, मतदार यादी व तत्सम बाबींचा त्यात उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे जिल्ह्यात अफवांना पेव फुटले होते. प्रकरणी याबाबत सायबर सेल सक्रिय झाले. प्रकरणात चौकशीचे आदेश देण्यात आले आहे. खुद्द पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांनी समोर येत संग्रामपूर आणि मेहकर तालुक्यात असा प्रकार घडला नसल्याचे स्पष्ट करत नागरिकांनी निर्भय वातावरणात मतदान करावे, अफवा पसरविणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे यास पूर्णविराम मिळाला. यापूर्वीही समाजमाध्यमावरून चुकीची माहिती पसरविण्याचे प्रकार जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीदरम्यान समोर आले होते.

# लोकशाहीच्या उत्सवात युवकांचा सर्वाधिक सहभाग

**जनसंचलन/ खामगाव**

लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, याकरिता प्रशासनाच्या वतीने अगदी ग्राउंड लेव्हलपर्यंत जनजागृती करण्यात आली. यामुळे चाळिशीपार गेलेल्या तापमानातही बुलढाणा मतदारसंघात मतदानासाठी मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. लोकशाहीच्या उत्सवात आपला हक्क बजाविणाऱ्या मतदारांमध्ये युवकांचा सर्वाधिक सहभाग असल्याचे मतदारांच्या गर्दीवरून दिसून आले. मतदान हा लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे. मात्र, इतर निवडणुकांच्या तुलनेत लोकसभा निवडणुकीत मतदारांमध्ये उदासीनता असल्याने त्याचा परिणाम आकडेवारीवर होतो. यामुळे प्रशासनाने गत लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदानाच्या टक्केवारीने उच्चांक गाठावा, याकरिता प्रशासनाने गावागावांत पोहोचून त्यादृष्टीने प्रयत्न केले. याचा सकारात्मक परिणाम युवकांवर दिसून आला. युवकांनी स्वतः जास्तीत जास्त संख्येने मतदान केलेच, शिवाय ज्येष्ठ व मतदानाप्रती निरसता दाखविणाऱ्या मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित केले. जळगाव जामोद मतदारसंघातील खेर्डा, आसलगाव, पिंपळगाव काळे, वडशिंगी व खामगाव मतदारसंघातील पिंपळगाव राजा, सुटाळा बु.सुटाळा खुर्द, ढोरपगाव, भालेगाव, लाखनवाडा यासह जवळपास ग्रामीण भागातील सर्वच मतदान केंद्रांवर हे चित्र होते.

# अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी पत्नीसह बजावला मतदानाचा हक्क

**जनसंचलन/बुलढाणा**



अपक्ष उमेदवार तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी आज सकाळी नऊ वाजेच्या सुमारास सुंदरखेड येथील मतदान केंद्रावर त्यांच्या पत्नीसह मतदान केले. बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी २६ एप्रिल ला मतदान होते संदीप शेळके अपक्षरीत्या लोकसभा निवडणूक रिंगणात आहेत यापूर्वी संदीप शेळके यांनी प्रचारात मुसंडी घेतली होती. विकासाचे विजन मांडून त्यांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला होता निवडणूक विभागाकडून त्यांना कॅमेरा हे चिन्ह मिळाले आहे आज सकाळी सुंदर खेड येथील मतदान केंद्रावर शेळके यांनी मतदान केले याप्रसंगी त्यांच्यासह राजश्री शाहू मल्टीस्टेटच्या मालती ताई शेळके या उपस्थित होत्या यावेळी माध्यमांशी बोलताना शेळके म्हणाले की भारतीय लोकशाहीचे सर्वात मोठे पर्व म्हणजे लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक आहे जिल्ह्याच्या देशाच्या विकासासाठी मी मतदान केले आपण देखील आवर्जून मतदान करा असे आवाहन संदीप शेळके यांनी केले होते या आधी नेहमीच मतदानाचा हक्क बजावला आहे परंतु उमेदवार असताना पहिल्यांदाच मतदान केल्याने खूप आनंद होतोय असे संदीप शेळके यांनी दैनिक जनसंचलशी बोलताना सांगितले.

# मतदानाच्या दिवशीच पहाटे खामगावात हत्येचा थरार...

**जनसंचलन/ खामगाव**

दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका युवकाची धारधार शस्त्राने हत्या करण्यात आली. दीपक जगदिश सिसोदिया असे मृतकाचे नाव आहे. शुक्रवारी पहाटे ही खळबळ जनक घटना शहराच्या मध्य वस्तीतील मुक्तेश्वर आश्रम परिसरातील मंगल कार्यालयाच्या शौचालयात घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी एका आरोपी विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, दीपक जगदिश सिसोदिया आणि त्याचे मित्र स्थानिक मुक्तेश्वर आश्रमासमोर उभे होते. त्यावेळी फरशी येथील हनुमान मंदिरामागे राहणारा राजेंद्र कांडेलकर ३९ हा घटनास्थळी हातात सुरा घेऊन आला. तक्रारदार प्रवीण सिसोदिया रा.सुटाळपुरा यांचा भाऊ दीपक याला दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. दीपकने पैसे देण्यास नकार दिल्याने अश्लील शिवीगाळ करीत मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी दीपक आणि त्याचा मित्र ऋषी भोलढाणे जिवाच्या आकांताने मुक्तेश्वर आश्रम परिसरातील मंगल कार्यालयाच्या शौचालयात धावत सुटले. मृतक आणि त्याचा मित्र शौचालयात लपले. आरोपी तिथेही धावत सुटला. त्याने दीपकच्या छातीत सुरा भोसकून गंभीर जखमी केले. झटापटीत दीपकच्या मित्र ऋषीच्या हाताला सुरा लागला. यात तो जखमी झाला. जखमी अवस्थेत दीपकला खामगाव येथील सामान्य रुग्णालयात




भरती केले. तेथे डॉक्टरांनी तपासणीअंती मृत घोषित केले. घटनेनंतर फरार आरोपीचा पोलिसांनी शोध घेऊन त्याला अटक केली. याप्रकरणी शहर पोलिसांनी पोलिस तक्रार आणि वैद्यकीय अहवालावरून आरोपी विरोधात भादंवि कलम ३०२, ३२३, ५०४, सहकलम ३ (२) (५) अजा ज प्र. कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी विनोद ठाकरे करीत आहेत.

# हरीण आडवे आल्याने दुचाकीचा अपघात महिला ठार,एक गंभीर

**जनसंचलन/ संग्रामपूर**

तालुक्यातील दुर्गादैत्य येथील गजानन आनंदा कराळे पत्नीसह शुक्रवारी शेगावकडे जाताना जस्तगाव फाट्यावर हरीण आडवे आल्याने दुचाकी खाली पडली, त्यावेळी पत्नी कांताबाई गजानन कराळे यांच्या डोक्याला मार लागला.त्यांना रुग्णालयात दाखल केले असता मृत घोषित करण्यात आले. सकाळी गजानन कराळे दुचाकीने (क्र. एमएच २८ बीएन ७७१८) जात होते. धावत्या दुचाकीसमोर हरीण आडवे आल्याने पती-पत्नी खाली पडले. त्यांना वरवट बकाल येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे कांताबाई कराळे त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले तर




गजानन कराळे गंभीर जखम असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# अंढेरा येथे ५६.६२ टक्के मतदान...

**जनसंचलन/ अंढेरा**

स्थानिक अंढेरा येथे १८ व्या लोकसभेसाठी आज दुसऱ्या टप्यात अंढेरा येथे एकुण ४ मतदान केंद्रावर व सेवानगर येथील १ मतदान केंद्रावर शांततेत मतदाना पार पडले. अंढेरा येथे एकुण ४१६४ मतदार आहेत. त्यापैकी २ हजार ३५८ एवढे मतदान झाले. मतदान केंद्र क्रमांक ६१ एकुणमध्ये मतदान ८६६ पैकी ५१५ मतदान झाले यामध्ये पुरुषा २८५, स्त्री २३० मतदारांचा समावेश आहे मतदान केंद्र क्रमांक ६२ मध्ये एकुण



मतदान ८८४ पैकी ५२१ मतदान झाले. यामध्ये पुरुष २८६ स्त्री २३५ यांचा समावेश आहे मतदान केंद्र क्रमांक ६३ एकुण मतदान १ हजार २१६ पैकी ६५८ पुरुष ३४६, स्त्री ३१२, मतदान केंद्र क्रमांक ६४ एकुण मतदान ११९८ पैकी ६६२ एवढे मतदान झाले.

# बच्चू कोणाला कडू? मैदानावरुन राडा, रडारवर राणा प्रहारच्या आक्रमक राजकारणाचा फायदा कोणाला?



**वृत्तसंस्था/ अमरावती**

महायुतीत असूनही भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधात असूनही बच्चू कडू यांनी वातावरण तापवलं. कडू यांनी त्यांच्या प्रहारचा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवल्यानं भाजप विरुद्ध काँग्रेस अशी वाटणारी निवडणूक तिरंगी झाली. अमरावतीत आज मतदान सुरु आहे. कडूंच्या संघर्षाचा फायदा नेमका कोणाला होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचं उत्तर ४ जूनला मिळेल.गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यानं नवनीत राणा विजयी झाल्या. मात्र त्यानंतर त्यांनी राज्यातील बदलेलं राजकीय वातावरण पाहून भाजपला पूरक भूमिका घेतली. राजकीय हवा बघून तवा मांडण्यात पटाईत असलेल्या राणांनी पुढे जाईन सोयीस्कर भूमिका घेऊ नये म्हणून भाजपनं त्यांचा पक्षप्रवेश घडवला. मगच त्यांना लोकसभेची उमेदवारी दिली. त्यांच्या उमेदवारीला भाजपमधूनच विरोध होता. पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं. विशेष म्हणजे केवळ नवनीत राणांनीच भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे पती रवी राणांनी युवा स्वाभिमान पक्षात राहून आपली वेगळी ओळख कायम ठेवत स्वतंत्रपणे राजकारण करण्याचा पर्याय खुला ठेवला.राणा आणि बच्चू कडू यांच्यातलं राजकीय वैमनस्य सर्वश्रुत आहे. महायुतीत असलेल्या कडूंनी राणांच्या उमेदवारी तीव्र विरोध केला. आपण लाचार नसल्याचं म्हणत त्यांनी राणांसाठी काम करण्यास नकार दिला. दिनेश बूब यांच्या रुपात त्यांनी प्रहारचा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवला. त्यामुळे काँग्रेसचे बळवंत वानखडे विरुद्ध भाजपच्या नवनीत राणा अशी वाटणारी लोकसभेची लढत तिरंगी झाली.वानखडे विरुद्ध राणा यांच्यात थेट लढत झाली असती तर भाजपला बराच संघर्ष करावा लागला असता, अशी परिस्थिती होती. पण राणांच्या पराभवासाठी आपण उमेदवार देत असल्याचं म्हणत कडूंनी दंड थोपटले. अमित शहांच्या सभेआधी कडूंनी मैदान सोडण्यास नकार दिला. मैदानातच राडा झाला. पोलिसांसोबत संघर्ष झाला. त्यामुळे कडूंची बरीच चर्चा झाली.बच्चू कडूंनी अमरावतीत भलीमोठी रॅली काढली. कडूंनी घेतलेल्या भूमिकेचा फायदा भाजपला होऊ शकतो. कडूंच्या उमेदवारामुळे मतविभाजन होण्याची दाट शक्यता आहे. तशी चर्चा अमरावतीत आहे. त्यामुळे कडू यांचा संघर्ष नेमका कोणासाठी सुरू आहे, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

## मैदानी खेळांकडे दुर्लक्ष अन् मोबाइल गेमकडे वाढतोय ओढा मुलांचा शारीरिक व्यायाम झाला कमी...





**जनसंचलन/बुलढाणा**

डिजिटल युगात पूर्वी गावखेड्यात खेळले जाणारे मैदानी खेळ मोबाइलमुळे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शारीरिक व्यायाम कमी झाला आहे. परिणामी, लहान वयातच मुलांना विविध आजारांसह डोळ्यांना चष्मा लागत आहे. विविध खेळांमुळे विद्यार्थ्यांची योग्य वयातच शारीरिक वाढ होत असते. वैयक्तिक व सांघिक खेळांमुळे व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व, निर्णय क्षमता, चातुर्य व सांघिक वृत्तीही वाढ होण्यास मदत होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून मुले मैदानी खेळाऐवजी मोबाइलच्या मोबाइलच्या जाळ्यात अडकत आहेत. पूर्वी खेळले जाणारे विटी-दांडू, गोट्या, भोवरा, लपण-चिपण, लगोरी, कबड्डी, आतीमाती, खो-खो, आट्यापाट्या आदी खेळ मोबाइलच्या जमान्यात नामशेष होत आहेत. काही वर्षांपूर्वी उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या की मुलांमध्ये आनंदाचे वातावरण असायचे, मोबाइलपासून कोसो दूर असलेली ही पिढी मैदानी खेळात रंगताना दिसून येत होती. विविध प्रकारचे खेळ खेळण्यात जणू काही दिवस कमी पडायचा. आधुनिक काळातील मुले जुने खेळ विसरत चालले आहेत. सततच्या मोबाइल वापरामुळे मुलांच्या पालकांची चांगलीच डोकेदुखी वाढली आहे, मुलांना मोबाइलपासून दूर ठेवणे हे पालकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. आता मैदानी खेळांची जागा व्हिडीओ गेम, मोबाइलमधील गेम, टीव्ही, लॅपटॉप, संगणक यासारख्या वस्तूंनी घेतली आहे. प्रत्येक वयोगटातील मुले मैदानी खेळ खेळण्यापेक्षा मोबाइलमधील गेम व टीव्ही, लॅपटॉप, संगणक यामधील गेम खेळताना दिसून येतात. बाकीच्या खेळांपेक्षा विटी-दांडू हा खेळ केव्हाच बाद झाला आहे. परंतु, मुलांना पूर्वीचे मैदानी खेळ समजावून सांगत त्यांना ग्रामीण खेळाकडे प्रवृत्त करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. जेणेकरून त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहील.

## भाजप वापरणार ठाकरे पॅटर्न शिंदेसेनेला सायलेंट करण्याची रिसॉर्टमध्ये रणनीती ठरली?

**वृत्तसंस्था/पालघर**



लोकसभा निवडणुकीच्या वाटाघाटीत शिंदेंच्या शिवसेनेला सर्वाधिक नुकसान सहन करावं लागलं आहे. युतीत शिवसेना लढत असलेल्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग, परभणी, अमरावती, धाराशिव या चार जागा शिंदेंना सोडाव्या लागल्या आहेत. सेना आतापर्यंत लढवत असलेल्या चारपैकी दोन जागा भाजपला, एक जागा राष्ट्रवादीला, तर एक जागा रासपला गेली आहे. आता शिंदेसेनेला आणखी एक जागा सोडावी लागण्याची शक्यता आहे. पालघरमध्ये सेनेचा खासदार असताना ही जागा भाजपला सोडावी लागण्याची नामुष्की शिंदेसेनेवर ओढावू शकते.पालघरची जागा शिवसेनेकडे आहे. इथे राजेंद्र गावित खासदार आहेत. पालघरच्या जागेवरुन शिवसेनेकडे राहणार की भाजपकडे जाणार याबद्दल संभ्रम आहे. त्यात आता बहुजन विकास आघाडीला महायुती घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे गावित यांचा पत्ता कट होण्याची दाट शक्यता आहे. बविआला महायुतीत घेऊन त्यांच्या उमेदवाराला कमळ चिन्हावर लढवण्याची चाचपणी केली जात आहेमनोरमधील सायलेंट रिसॉर्टमध्ये झालेल्या बैठकीनंतर भाजप शिंदेसेनेला पालघरमध्ये सायलेंट करणार याची चर्चा जोर धरु लागली आहे. सायलेंट रिसॉर्टमध्ये पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला जिल्ह्यातील कोअर कमिटी, पालघर, बोईसर, डहाणू, विक्रमगड अशा चार विधानसभांचे केंद्रप्रमुख, बुथप्रमुख, सुपर वॉरियर उपस्थित होते. बविआ हा चौथा पर्याय उपलब्ध झाल्यास लग्न आपल्या घरचं आहे. मोदींना पुन्हा पंतप्रधान करायचंय. त्यामुळे सर्वांनी जोरकस प्रयत्न करुन महायुती जो उमेदवार देईल, त्याला निवडून आणायचंय, अशा सूचना पालकमंत्री चव्हाणांनी दिल्या२०१४ मध्ये पालघरची जागा भाजपनं जिंकली. चिंतामण वनगा इथून विजयी झाले. २०१८ मध्ये त्यांचं निधन झाल्यानंतर मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. भाजपनं राजेंद्र गावित यांना तिकीट दिलं आणि निवडून आणलं. २०१९ मध्ये झालेल्या वाटाघाटीत पालघरची जागा शिवसेनेला मिळाली. पण सेनेकडे सक्षम उमेदवार नव्हता. त्यामुळे गावित यांनाच सेनेनं आपल्याकडे घेतलं. ठाकरेंनी त्यांच्या हाती शिवबंधन बांधलं. गावित यांना उमेदवारी देण्यात आली. ते जिंकूनही आले.२०१९ मध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी वापरलेला डाव वापरुन शिंदेंच्या सेनेला चीतपट करण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू असल्याचं दिसतंय. भाजप बविआच्या उमेदवाराला पालघरमध्ये भाजपच्या चिन्हावर लढण्यास सांगण्याची शक्यता आहे. हा उमेदवार विजयी झाल्यास भाजपचं संख्याबळ वाढेल. तर शिंदेंना धोबीपछाड मिळेल. विद्यमान खासदार सेनेचा असताना ती जागा गमावण्याची नामुष्की मुख्यमंत्र्यांवर येईल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

# उमेदवारांनी सुध्दा बजावला आपला मतदानाचा हक्क...



अपक्ष उमेदवार संदीप शेळके पत्नीसह आपला मतदानाचा हक्क बजावताना



महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव पत्नीसह मतदान करतांना



महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.नरेंद्र खेडेकर आपला मतदानाचा हक्क बजावताना



अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर पत्नीसह मतदान करतांना



वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मगर यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला

## राजकीय पदाधिकाऱ्यांनी सुध्दा केला लोकशाहीचा उत्सव साजरा



बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड पत्नीसह मतदान करतांना



आमदार भाजप नेते मा.आमदार विजयराज शिंदे पत्नीसह आपला मतदानाचा हक्क बजवताना



काँग्रेस नेत्या सौ.जयश्रीताई शेळके पती श्री.सुनील शेळकेसह मतदान करतांना



अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष सौ.अनुजा-ताई सावळे पतीसह मतदान करतांना

# जिल्हावासियांनी बजावला आपला मतदानाचा हक्क...

